



दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता


Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १२३ । किंमत - २ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । शुक्रवार । २२/०५/२०२६ । पाने -६








## शिक्षक बँकेच्या अध्यक्षपदी सरस्वती घुले



**जिल्हा शिक्षक बँकेच्या अध्यक्षपदी सरस्वती घुले यांची निवड झाल्याबद्दल संगमनेर शाखेच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षक नेते आर. पी. राहणे, पी. डी. सोनवणे, कैलास सहाणे, शिक्षक बँकेचे संचालक भाऊराव राहिंज, शिक्षक बँकेचे माजी चेअरमन राजू रहाणे, व्हा. चेअरमन संतोष दळे, सोमनाथ घुले, मच्छिंद्र ढोकरे, राजू हासे, केशव घुगे, बाळू गुंजाळ, राजू आव्हाड, अक्षय खतोडे, पंकज कवडे, प्रदीप बागुल, विलास शिरोळे, शिवाजी चत्तर, दत्ता आंबरे, महिला अध्यक्ष सुनीता घुले, उषा भोकनळ आदि उपस्थित होते.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेच्या अध्यक्षपदी संगमनेरच्या संचालिका सरस्वती घुले -सहाणे यांची तर उपाध्यक्षपदी शिवाजी कराड यांची निवड करण्यात आली. जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्या उपस्थितीत ही निवड करण्यात आली.

मावळते अध्यक्ष गोरक्षनाथ विटनोर व उपाध्यक्ष ज्ञानेश्वर शिरसाठ यांनी राजीनामा दिल्याने दोन्ही पदांसाठी निवडी प्रक्रिया राबविण्यात आली. संदीप मोटे पाटील यांनी अध्यक्षपदाची सूचना मांडली. त्यास अनुमोदन निर्गुणा बांगर-कापसे यांनी दिले. तर उपाध्यक्षपदाची सूचना ज्ञानेश्वर शिरसाठ यांनी मांडली तर अनुमोदन अण्णासाहेब आभाळे यांनी दिले. अध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत १७ विरुद्ध ४ मतांनी घुले यांनी बाजी मारली. कराड यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली.

- शिक्षक नेते बापूसाहेब तांबे यांनी आगामी २०२७ साली होणाऱ्या निवडणुकीत गुरुमाऊली-सदिच्छा मंडळ व आघाडी पुन्हा निवडून येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. तसेच जिल्ह्यातील (पान २

# मेडिकल व्यावसायिकांचा शहरात मोर्चा

## ऑनलाइन औषध विक्री तातडीने बंद करण्याची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे वाढत असलेल्या औषध विक्रीविरोधात देशभरातील मेडिकल व्यावसायिकांनी आक्रमक भूमिका घेतली असून, रुग्णांच्या आरोग्य सुरक्षेचा प्रश्न उपस्थित करत ई-फार्मसीवर कठोर निर्बंध अथवा संपूर्ण बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे. त्याच पार्श्वभूमीवर बुधवारी (दि. २०) पुकारण्यात आलेल्या देशव्यापी मेडिकल बंद आंदोलनाला संगमनेर तालुक्यातही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरातील मेडिकल व्यावसायिकांनी मोर्चा काढून प्रशासकीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.



ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्स असोसिएशनच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात तालुक्यातील मोठ्या संख्येने मेडिकल व्यावसायिक सहभागी झाले होते. वाढत्या ऑनलाइन औषध विक्रीमुळे बनावट, मुदतबाह्य आणि निकृष्ट दर्जाच्या औषधांचा पुरवठा होण्याची शक्यता असल्याची गंभीर चिंता यावेळी व्यक्त करण्यात आली.

केमिस्ट अँण्ड ड्रगिस्ट असोसिएशनचे संगमनेर तालुकाध्यक्ष महेश अभंग यांनी सांगितले की, इंटरनेट व मोबाईल ॲपच्या माध्यमातून औषध विक्री मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. या प्रक्रियेमुळे औषध विक्रीवरील नियंत्रण कमी होत असून अनेक वेळा डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधे उपलब्ध होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे रुग्णांच्या जीवाशी खेळ होण्याचा धोका निर्माण होत आहे.

देशव्यापी बंदमध्ये संगमनेर शहर व ग्रामीण भागातील बहुतांश मेडिकल दुकाने पूर्णपणे बंद ठेवण्यात आली होती. मात्र, रुग्णांच्या सोयीचा विचार करून रुग्णालयांशी संलग्न असलेली औषध दुकाने आणि आपत्कालीन सेवा सुरू ठेवण्यात आल्या होत्या. त्यामुळे रुग्णांना कोणत्याही मोठ्या अडचणीचा सामना करावा लागला नाही. औषध विक्रेत्यांनी केंद्र सरकारकडे ई-फार्मसी संदर्भात कठोर नियमावली लागू करण्याची मागणी केली आहे. ड्रग्ज अँण्ड कॉस्मेटिक्स ॲक्टची प्रभावी अंमलबजावणी करून ऑनलाइन औषध विक्रीवर नियंत्रण आणावे, अशी भूमिका मांडण्यात आली.

यावेळी व्यावसायिकांनी ऑनलाइन कंपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या मोठ्या सवलतींवरही आक्षेप घेतला. या अवास्तव सवलतींमुळे स्थानिक मेडिकल दुकानदारांच्या व्यवसायावर गंभीर परिणाम होत असून, त्यांचे अस्तित्व धोक्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच गर्भपातासाठी वापरली जाणारी औषधे, बंदी असलेली औषधे किंवा नशेसाठी गैरवापर होऊ शकणारी औषधे ऑनलाइन सहज उपलब्ध होत असल्याने समाजात गंभीर परिणाम घडू शकतात अशी चिंता व्यक्त करण्यात आली.

या आंदोलनात ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे, सचिव राजीव सिंघल तसेच महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँण्ड ड्रगिस्ट असोसिएशनचे सचिव अनिल नावंदर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील औषध विक्रेते सहभागी झाले होते.

# स्टोन क्रशरविरोधात ग्रामस्थ आक्रमक

## पालकमंत्र्यांना निवेदन, १ जूनपासून उपोषणाचा इशारा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर तालुक्यातील वडझरी परिसरात सुरू असलेल्या कथित बेकायदेशीर स्टोन क्रशर आणि खाणकामाविरोधात ग्रामस्थांनी आता आक्रमक भूमिका घेतली असून, पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन देत संबंधितांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. वारंवार तक्रारी, आंदोलनाचे इशारे आणि पालकमंत्र्यांच्या स्पष्ट सूचनांनंतरही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, परिसरात नियमबाह्य पद्धतीने स्टोन क्रेशर आणि खाणकाम सुरू असून दिवस-रात्र मोठ्या प्रमाणात ब्लास्टिंग केले जात आहे. विशेषतः मध्यरात्री होणाऱ्या बोअर ब्लास्टिंगमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मोठ्या स्फोटांच्या आवाजामुळे जनावरे घाबरत असून, लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावरही गंभीर परिणाम होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. सततच्या ब्लास्टिंगमुळे अनेक घरांना तडे गेल्याच्या तक्रारी पुढे येत असून, धूळप्रदूषणामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. गावपातळीवर घर, गाय-गोठे, विहिरी आणि बोअरवेलचे पंचनामे करण्यात आल्याचे सांगितले जात असले तरी वरिष्ठ स्तरावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये उलटसुलट चर्चा सुरू आहे. यामागे नेमके कोणाचे पाठबळ आहे? असा थेट सवालही ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

पालकमंत्र्यांनी स्पष्ट सूचना दिल्यानंतरही अधिकारी संबंधित खाण आणि क्रशर मालकांवर कारवाई करण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोप करत प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. रस्त्यांची दुरवस्था, रात्रीचे भयावह वातावरण आणि प्रशासनाची निष्क्रियता यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दरम्यान, प्रशासनाने तात्काळ संबंधित बेकायदेशीर खाणकाम आणि स्टोन क्रेशर बंद न केल्यास १ जूनपासून आमरण उपोषण आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत वडझरी परिसरातील वातावरण अधिक तापण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, प्रशासन आता कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# वडगाव पान आरटीओ कॅम्पवर आ. अमोल खताळांची अचानक भेट

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर-संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथे उपप्रादेशिक परिवहन विभाग, श्रीरामपूर यांच्या वतीने दर महिन्या च्या प्रत्येक बुधवारी वाहन परवाना (लायसन्स) धारक व वाहनचालकां साठी विशेष कॅम्प आयोजित केला जातो. या कॅम्पमध्ये अनेक एजंट सर्वसामान्य वाहनचालकांकडून अवाजवी पैसे उकळत असल्याच्या तक्रारी वाहनचालकांनी आमदार अमोल खताळ पाटील यांच्याकडे केल्या होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत आमदार खताळ यांनी बुधवारी अचानक वडगाव पान येथील कॅम्पला धाड टाकत परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरत एजंटांच्या माध्यमातून सुरू असले ल्या गैरप्रकारांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.



तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत वडगाव पान साठवण तलावात आलेले पाणी तळेगाव सह २१गावांना सोडण्याच्या कार्यक्रमा साठी आमदार अमोल खताळगेले होते पाणी सोडल्यानंतर संगमनेरकडे परतत येत असताना वडगाव पान येथील आरटीओ कॅम्पमध्ये एजंटां च्या माध्यमातून वाहन चालकांची आर्थिक लूट होत असल्याच्या तक्रारींची पडताळणी करण्यासाठी आमदार खताळ यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता कॅम्पला भेट देत धाड टाकली अचानक आमदार खताळ आले असल्याचे पाहताच आरटीओ अधिकाऱ्यांची एकच तारांबळ उडाली

शासनाच्या सेवांसाठी नागरिकांना एजंटांच्या दारात जावे लागणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. सर्वसामान्य वाहन चालकांची अडवणूक होत असेल तर ती तात्काळ बंद झाली पाहिजे. नागरिकांना तुमच्या कोणत्याही प्रकारचा त्रास होता कामा नये, असे सक्त निर्देश उपप्रादेशिक परिवहन विभाग अधिकाऱ्यांना दिले. आमदार खताळ यांच्या या कारवाईचे वाहन चालकांनी स्वागत केले आहे

**वडगाव पान येथील आरटीओ कॅम्पच्या स्थळावरून आमदार अमोल खताळ यांनी थेट परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना फोन लावत परिवहन विभागाच्या कामकाजात सुधारणा होणेबाबत तसेच संगमनेर येथे परिवहन कार्यालय सुरू करणेबाबत विनंती केली. ज्या अधिकारीबाबत तक्रारी आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात येईलअसे परिवहन मंत्र्यांनी आमदार अमोल खताळ यांना सांगितले.**










# ओबीसींसाठी नॉन-क्रिमी लेयर मर्यादा १५ लाखांपर्यंत वाढवणार ?

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रातील ओबीसी समाजासाठी नॉन-क्रिमी लेयर उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपयांवरून १५ लाख रुपयांपर्यंत वाढवण्याची आणि ४३ नवीन जातींचा समावेश करण्याची मोठी शिफारस करण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार महाराष्ट्र सरकार इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजाला मोठे प्रोत्साहन देण्याच्या तयारीत आहे. राज्यातील ओबीसी समाजासाठी नॉन-क्रिमी लेयर उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपयांवरून १५ लाख रुपयांपर्यंत वाढवण्याची शिफारस करण्यात आली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ओबीसी



उपसमितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या प्रस्तावावर लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतच्या बैठकीत चर्चा केली जाईल.महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखालील ओबीसी उपसमितीने केवळ उत्पन्न मर्यादेवरच नव्हे, तर ओबीसी प्रवर्गाच्या विस्तारावरही चर्चा केली. ओबीसी समाजात ४३ नवीन जातींचा समावेश करण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर करण्याचा निर्णयही घेण्यात आला. जात प्रमाणपत्र पडताळणीशी संबंधित प्रलंबित प्रकरणांचा निपटारा लवकरात लवकर करण्याचे निर्देशही अधिकाऱ्यांना देण्यात आले.ओबीसी उपसमितीने ओबीसी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सुविधा आणि योजनांचाही आढावा घेतला. चुकीच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे दिली जाणार नाहीत याची खात्री करण्यासाठी विशेष दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले.

# अजित पवारांच्या विमान अपघातामागे अशोक खरातच मास्टरमाईंड ? अमोल मिटकरींच्या आरोपांनी खळबळ

मुंबई (वृत्तसंस्था)

अजित पवार यांच्या अपघाताबाबत वारंवार शंका उपस्थित केल्या जात आहेत. आमदार रोहित पवार आणि राष्ट्रवादी (अजित पवार) चे नेते अमोल मिटकरी यावर सातत्याने प्रश्न उपस्थित करत आहेत. राज्यात भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण उघडकीस आल्यानंतर याचा संबंध देखील अपघाताशी जोडला जात आहे. खरात प्रकरणात राजकीय नेत्यांची नावे समोर आल्यानंतर याबाबत शंका उपस्थित करण्यात आल्या. अमोल



मिटकरी यांनी तर आता अजित पवारांच्या अपघातामागे अशोक खरातच मास्टरमाईंड असल्याची शंका व्यक्त करण्यास वाव मिळत असल्याचे म्हटले आहे.

अशोक खरातने बदललेले मोबाईल आणि केलेले फोन कॉल्स संपूर्ण प्रकरणात दुर्लक्षित राहिल्याचे मिटकरी यांनी म्हटले आहे. विधान परिषदेचे माजी आमदार अमोल मिटकरी यांनी एक्स (पूर्वीचे ट्विटर) वर एक पोस्ट करुन अजित पवारांच्या अपघाताबाबत शंका उपस्थित केली. डिसेंबर महिन्याच्या अखेरीस खरात कोणाकोणाच्या संपर्कात होता याचा देखील एसआयटी प्रमुखांनी तपास करण्याची गरज मिटकरींनी पोस्टमधून व्यक्त केली आहे.

अजित पवारांच्या विमान अपघातामागे कॅप्टन अशोक खरात हाच मास्टरमाईंड आहे या शंकेस वाव मिळतोय. खरातने बदललेले मोबाईल व केलेले फोन कॉल्स ही बाब या संपुर्ण प्रकारणात दुर्लक्षित राहिली आहे. २७, २८, २९, ३०, ३१ डिसेंबर २०२६ ला खरात वेगवेगळ्या मोबाईलवरून कुणाकुणाच्या संपर्कात राहून यथाकाळे कार्यसिद्धी करत होता हे एसआयटी तपास प्रमुखांनी तपासातून सिद्ध करायला हवे. मात्र एकंदरीत याच तपास कार्यावर आता प्रश्नचिन्ह निर्माण होतय, अशी पोस्ट करुन मिटकरींनी शंका व्यक्त केली आहे.

# अनुदानित खतांसोबत विना अनुदानित खतांची सक्तीची विक्री बंद - कृषीमंत्री

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात काही खत उत्पादक आणि पुरवठादार कंपन्यांकडून अनुदानित खतांच्या विक्रीसोबत विनाअनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते, जैवउत्तेजके सक्तीने विक्री (टॅगिंग/लिंकिंग) केली जात असल्याचे प्रकार उघडकीस आले होते. त्याची कृषी विभागाने गंभीर दखल घेतली आहे. त्यानुसार, अनुदानित खतांसोबत विना अनुदानित खतांची सक्तीची विक्री बंद करण्यात आली असून, नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी बुधवारी दिला.केंद्रीय रसायने आणि खते मंत्रालयानेही खतांसोबत इतर उत्पादनांचे 'टॅगिंग' करणे हे बेकायदेशीर आणि अन्यायकारक असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे राज्य शासनाने आता अनुदानित खतांचा पुरवठा करताना इतर कोणत्याही उत्पादनांची सक्ती करण्यास मनाई केली आहे. बुधवारी जाहीर झालेल्या शासन निर्णयानुसार, राज्यातील अनुदानित खतांचे उत्पादक आणि पुरवठादार कंपन्यांना त्यांच्या परवान्यात नमूद असलेल्या अनुदानित रासायनिक खतांव्यतिरिक्त इतर विनाअनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते, जैवउत्तेजके यांचा पुरवठा व विक्री करता येणार नाही. या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या सूचना कृषी आयुक्तालय, पुणे यांना देण्यात आल्या आहेत. तसेच, कोणतीही कंपनी किंवा विक्रेता टॅगिंग अथवा लिंकिंग करत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

## वाहनचालकांची लुट थांबविण्यासाठी आमदारांच्या सूचना - श्रीनाथ थोरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्याच्या विकास कामांची चिंता करण्याची गरज नाही. विकासकामे प्रभावीपणे राबविण्यासाठी आमदार अमोल खताळ हे सक्षम आणि भक्कम आहेत. त्यामुळे काहींनी तालुक्याच्या विकासाबाबत खोटा कांगावा करून जनतेची दिशाभूल करू नये, अशी टीका वडगावपानचे सरपंच श्रीनाथ थोरात यांनी विरोधकांवर केली.

- सरपंच थोरात यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आमदार अमोल खताळ यांनी अल्पावधीतच संगमनेर तालुक्यात पाणीपुरवठा, वीज, रस्ते, रोजगार, शेती आणि पायाभूत सुविधांच्या अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर ठोस कामे केली आहेत. त्यामुळे तालुक्याच्या विकासाबाबत कोणालाही शंका घेण्याचे कारण नाही., वडगावपान येथे श्रीरामपूर उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या कॅम्पदरम्यान काही एजंटांकडून वाहनचालकांची आर्थिक लूट होत असल्याच्या तक्रारी आमदार अमोल खताळ यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत आमदार खताळ यांनी थेट संबंधित अधिकाऱ्यांशी तसेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी संपर्क साधून तात्काळ कारवाईची मागणी केली.

# 23 मे रोजी नाशिकला विभागीय कलावंत/ साहित्यिकांची बैठक

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - राज्यव्यापी कलावंतांची एकमेव पोलादी संघटना असलेल्या अखिल भारतीय कलावंत न्याय हक्क समिती या कलावंत संघटनेच्या वतीने येत्या शनिवार दिनांक २३ मे २०२६ रोजी वेळ दुपारी १ वाजता हुतात्मा स्मारक जिल्हाधिकारी कार्यालय समोर सीबीएस नाशिक या ठिकाणी अ. नगर / धुळे / जळगाव आणि नाशिक जिल्ह्यातील कलावंत/ साहित्यिक / वारकरी(भजनी मंडळ) यांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली असल्याचे माहितीपत्रक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुप्रसिद्ध गायक सोमनाथ गायकवाड यांनी प्रसिद्ध दिले आहे.

सदर बैठकीमध्ये वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे प्रामुख्याने १)कलावंतांची नाशिक जिल्हा कार्यकारणी स्थापन करणे २) संगमनेर या ठिकाणी विभागीय कलावंतांचा महाक्रांती मेळाव्याचे आयोजन करणे ३) नाशिक विभागातील कलावंतांचे अनेक प्रश्न शासन दरबारी प्रलंबित पडले आहेत त्या प्रश्नांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भव्य धरणे आंदोलनाची तयारी करणे... अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवरती या बैठकीमध्ये प्रामुख्याने चर्चा करण्यात येणार आहे. तरी धुळे/ जळगाव / नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील कलावंतांनी व साहित्यिकांनी या बैठकीस आवर्जून उपस्थित रहावे असे जाहीर आवाहन अखिल भारतीय कलावंत न्याय हक्क समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# शशिकला रावसाहेब शिंदे यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - शशिकलाताई रावसाहेब शिंदे यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने एक प्रेमळ, सुसंस्कृत आणि जिव्हाळ्याने नाती जपणारे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

कोल्हापूरच्या संस्कारमय भूमीतून शिंदे परिवारात आलेल्या शशिकलाताईंनी आपल्या साधेपणा, प्रेमळ स्वभाव आणि कुटुंबवत्सल वृत्तीने सर्वांच्या मनात एक विशेष स्थान निर्माण केले. देशाचे माजी कृषिमंत्री आदरणीय



अण्णासाहेब शिंदे आणि विख्यात विधीज्ञ आदरणीय रावसाहेब शिंदे यांच्या परिवाराचा भाग म्हणून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि वैचारिक परंपरा जपण्याचे कार्य समर्पित भावनेने केले.

रावसाहेब शिंदे यांच्या कार्याला त्यांनी आयुष्यभर खंबीर साथ दिली. स्वातंत्र्य चळवळीतील विचारांचा वारसा, समाजकारणाची जाणीव आणि शिक्षण क्षेत्रातील कार्य यामध्ये त्यांचा मोलाचा सहभाग होता. रयत शिक्षण संस्थेच्या कार्याशी जोडलेल्या या परिवारातील त्या एक संवेदनशील आणि ममतेची सावली होत्या. कै. शशिकला यांच्या निधनानंतर अनेक मान्यवरांनी शोक व्यक्त केला.

# रस्त्यावरील व दुर्लक्षित बालकांच्या पुनर्वसनासाठी 'फिरते पथक' - मंत्री तटकरे

मुंबई (वृत्तसंस्था)

रस्त्यावर राहणाऱ्या, अनाथ, एकल आणि दुर्लक्षित बालकांच्या पुनर्वसनासाठी 'फिरते पथक' पथदर्शी योजना सहा जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्यात आली होती. या पथदर्शी योजनेच्या धर्तीवर २२ जिल्ह्यातील ३१ महानगरपालिकांमध्ये फिरते पथक योजनेसाठी प्रस्ताव मागविण्याचे निर्देश महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. मंत्रालयात 'फिरते पथक' योजनेसंदर्भात आयोजित बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीस संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या योजनेअंतर्गत मोबाईल वाहनांच्या माध्यमातून रस्त्यावरील बालकांना पौष्टिक आहार, आरोग्य सेवा, शिक्षण, मनोरंजन सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच बालकांची आधार नोंदणी, समुपदेशन, मानसिक आधार आणि पालकांमध्ये शिक्षणाबाबत जनजागृती करण्यात येते.



रस्त्यावरील बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

यापूर्वी नाशिक, पुणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे आणि नागपूर या सहा जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात आला होता. या प्रकल्पाद्वारे आतापर्यंत ३ हजार ८०३ बालकांना शैक्षणिक, आरोग्यविषयक, मनोरंजन तसेच आहार सुविधा पुरविण्यात आल्या असून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात यश आले आहे. त्यामध्ये पुणे जिल्ह्यात सर्वाधिक १ हजार ६७९, मुंबई शहरात ८१०, ठाण्यात ७५०, नाशिकमध्ये २८५ आणि नागपुरात २७९ बालकांचा समावेश आहे.

राज्यातील २८ महानगरपालिका क्षेत्रांसह मुंबई शहर, पूर्व उपनगर आणि पश्चिम उपनगर अशा एकूण ३१ फिरत्या पथकांची अंमलबजावणी प्रस्तावित करण्यात आली आहे. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, स्वयंसेवी संस्थांना मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमांतर्गत नोंदणी, निधी पोर्टलवरील नोंद, मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल तसेच संस्थेची घटना आणि नियमावली सादर करणे आवश्यक राहील. तसेच फिरत्या पथकांसाठी नियुक्त वाहनांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि ट्रॅकिंग सिस्टीम बसविणे बंधनकारक करण्यात येणार असून ही यंत्रणा संबंधित पोलीस विभागाच्या समन्वयाने कार्य करेल.

## शिक्षक बँकेच्या अध्यक्षपदी ...

पान १ वरून -

प्राथमिक शिक्षिका या आमच्या लाडक्या बहिणी असून त्यांचे प्रतिनिधित्व घुले या करत आहेत सत्काराला उत्तर देताना घुले यांनी नेत्यांच्या विश्वासास पात्र राहून शिक्षक बँकेचा नावलौकिक वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. यावेळी विद्युलता आढाव, गोकुळ कळमकर, शरद सुद्रिक, राजेंद्र ठोकळ, संदीप मोटे, संचालक कल्याण लवांडे आदींनी मनोगत व्यक्त केले. दत्तात्रय कुलट, राजेंद्र सदगीर, अर्जुन शिरसाठ, बाबासाहेब खरात, रविकिरण साळवे, बबन गाडेकर, संतोष दुसुंगे, संतोष भोपे, रमेश दरेकर, विजय ठाणगे, पी.डी. सोनवणे, नारायण पिसे, आबासाहेब दळवी, राजेंद्र ठोकळ, प्रवीण झावरे, राजेंद्र निमसे, साहेबराव अनाप, बाळासाहेब कापसे आदींसह संघ व मंडळाचे तालुकाध्यक्षांसह मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते.







मा. पियुष भंडारी

संचालक, संगमनेर औद्यो. वसाहत



मा.अरूण हिरे

मा. चेअरमन , आशिर्वाद नागरी पतसंस्था

शुभेच्छुक - दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता





मधुमेह असतानाही खाऊ शकता आंबा; फक्त पाळा हे नियम उन्हाळा सुरू झाला की बाजारात आंब्याचा सुगंध दरवळू लागतो. रसाळ, गोड आणि स्वादिष्ट आंबा हा अनेकांचा आवडता फळ आहे. मात्र मधुमेह असलेल्या व्यक्तींमध्ये आंबा खाण्याबाबत अनेकदा संभ्रम निर्माण होतो. गोड चव असल्यामुळे आंबा खाल्ल्याने रक्तातील साखर वाढेल का, असा प्रश्न अनेकांना पडतो. तज्ज्ञांच्या मते, योग्य प्रमाण आणि योग्य पद्धतीने आंब्याचे सेवन केल्यास मधुमेहींनाही त्याचा आनंद घेता येऊ शकतो. आंब्यामध्ये जीवनसत्त्वे, फायबर, अँटिऑक्सिडंट्स आणि शरीरासाठी आवश्यक पोषक घटक मोठ्या प्रमाणात असतात. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. मात्र आंब्यात नैसर्गिक साखर असल्याने त्याचे प्रमाण नियंत्रणात ठेवणे आवश्यक आहे. विशेषतः एकावेळी जास्त प्रमाणात आंबा खाल्ल्यास रक्तातील ग्लुकोजची पातळी वाढू शकते. तज्ज्ञांच्या मते, मधुमेहींनी आंबा खाताना काही गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे. पिकलेला आणि ताजा आंबा मर्यादित प्रमाणात खावा. दिवसातून एक लहान वाटी किंवा काही फोडी एवढेच सेवन योग्य मानले जाते. तसेच आंबा खाल्ल्यानंतर इतर गोड पदार्थ टाळणे फायदेशीर ठरते. रिकाम्या पोटी आंबा खाणे टाळावे. सकाळच्या नाश्त्यानंतर किंवा दुपारच्या जेवणानंतर आंबा खाल्ल्यास साखर नियंत्रणात राहण्यास मदत होते. आंब्यासोबत प्रोटीनयुक्त पदार्थ किंवा सुका मेवा घेतल्यासही रक्तातील साखरेची वाढ तुलनेने कमी होऊ शकते. बाजारात मिळणारा आंब्याचा रस, मिल्कशेक किंवा प्रक्रिया केलेले मँगो पदार्थ यामध्ये अतिरिक्त साखर असू शकते. त्यामुळे मधुमेहींनी शक्यतो नैसर्गिक आणि ताज्या आंब्यालाच प्राधान्य द्यावे. योग्य प्रमाणात आणि संतुलित आहारासोबत आंब्याचे सेवन केल्यास मधुमेहींनाही उन्हाळ्यातील या फळाचा आस्वाद सुरक्षितपणे घेता येऊ शकतो.



# संगमनेरमध्ये बीएसएनएल पेन्शनधारकांचे धरणे आंदोलन

## आयडीए वाढीच्या तात्काळ अंमलबजावणीची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

०१ जानेवारी २०२६ पासून देय असलेल्या आयडीए वाढीची तात्काळ अंमलबजावणी करावी आणि जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीतील थकबाकीची रक्कम त्वरित अदा करावी या प्रमुख मागण्यांसाठी संगमनेर येथील बीएसएनएल पेन्शनधारकांनी बुधवारी बीएसएनएल कार्यालयाच्या परिसरात भव्य धरणे आंदोलन केले.

देशभरात सुरू असलेल्या आंदोलनाचा भाग म्हणून कमिटी ऑफ बीएसएनएल पेन्शनर्स असोसिएशन्स यांच्या वतीने हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते. तीव्र उन्हाळ्याच्या उष्णतेची पर्वा न करता सुमारे ३० पेन्शनधारकांनी उत्स्फूर्त सहभाग




नोंदवून आपल्या मागण्यांसाठी एकजुटीचे दर्शन घडवले. तसेच एयूएबी (ऑल युनियन्स अँड असोसिएशन्स ऑफ बीएसएनएल) यांनीही या आंदोलनाला पाठिंबा दिला.

पेन्शनधारकांच्या म्हणण्यानुसार, सार्वजनिक उपक्रम विभागाच्या २७ फेब्रुवारी २०२६ च्या आदेशामध्ये आर्थिक परिणाम या अटीचा समावेश करण्यात आल्याने ही समस्या निर्माण झाली आहे. त्यानंतर देशभरातील पेन्शनधारकांनी १६ एप्रिल रोजी आंदोलन छेडल्यानंतर २४ एप्रिलच्या नव्या आदेशात ही अट वगळण्यात आली. मात्र, ०१ जानेवारी २०२६ पासून लागू असलेली आयडीए वाढ आणि संबंधित थकबाकी अद्याप मंजूर झालेली नसल्याने पेन्शनधारकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

यावेळी पेन्शनधारकांनी सीसीए कार्यालयांकडून दूरसंचार विभागाच्या हस्तक्षेपाशिवाय आयडीए वाढ आपोआप लागू करण्याची पूर्वीची पद्धत पुन्हा सुरू करण्याची मागणीही केली.

या आंदोलनाचे नेतृत्व महाराष्ट्र परिमंडळाचे उपाध्यक्ष कॉ. मनोहर देशपांडे यांनी केले. यावेळी एआयबीडीपीए शाखा सचिव कॉ. साहेबराव डोंगरे, सहसचिव कॉ. एस. एन. जाधव, कॉ. डी. आर. काकड, उपाध्यक्ष संपत हांडे तसेच संघटनेचे अनेक पदाधिकारी आणि महिला सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच ऑल इंडिया बीएसएनएल पेन्शनर्स वेलफेअर असोसिएशनचे बी. टी. घुले आणि व्ही. डी. दीक्षित यांनीही आंदोलनात सहभाग घेतला.

पेन्शनधारकांनी त्यांच्या न्याय्य मागण्या पूर्ण होईपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.


संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०


आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# मोदींच्या स्वागतासाठी नॉर्वेत रंगला भारतीय संस्कृतीचा देखणा आविष्कार

## सावरगावतळच्या रेश्मा नेहे यांचा कला पुढाकार



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- नॉर्वे देशामध्ये भारतीय पंतप्रधान आणि लोकप्रिय जागतिक नेते नरेंद्रजी मोदी यांचे समोर नृत्य कला सादर करण्याचा बहुमान संगमनेर तालुक्यातील सावरगाव तळ येथील रेश्मा नेहे यांना मिळाला हा गौरवास्पद क्षण असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पाच देशांच्या परदेश दौऱ्यावर असून या दौऱ्यात त्यांनी नॉर्वे या देशालाही भेट दिली. या भेटीत राजधानी ओस्लो येथे त्यांना नॉर्वे देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान ग्रँड क्रॉस ऑफ द रॉयल नॉर्वेजियन ऑर्डर ऑफ मेरिट या सन्मानाने सन्मानपूर्वक गौरविण्यात आले. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे आपल्या भारतीय सांस्कृतिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. यावेळी मोदीजीचे सांस्कृतिक पद्धतीने शास्त्रीय नृत्य सादर करून स्वागत करण्याचा बहुमान नॉर्वे मध्ये भारतीय संगीत व नृत्य यांचे प्रशिक्षण वर्ग चालविण्याऱ्या मुळच्या सौ. रेश्मा नेहे यांच्या चमू ला मिळाला. सांस्कृतिक कार्यक्रमात रेश्मा नेहे आणि त्यांच्या सहकारी यांनी भरतनाटयम, कुचिपूडी, ओडीसी,कथक आणि मोहिनीपट्टम हे शास्त्रीय नृत्य सादर केले. आपल्या देशाचा सांस्कृतिक वारसा व परंपरेने केलेल्या विशेष स्वागताने पंतप्रधान मोदीजी अतिशय प्रसन्न व मंत्रमुग्ध झाले.

रेश्मा नेहे या सावरगाव तळ ता संगमनेर येथील साहेबराव गेनूभाऊ नेहे पाटील यांच्या पत्नी असून माहेर संगमनेर तालुक्यातील निमज असून शांताराम खंडेराव गुंजाळ यांच्या कन्या आहेत. साहेबराव नेहे हे नॉर्वे देशाची राजधानी ओस्लो येथे एका बहुराष्ट्रीय कंपनीत वरिष्ठ व्यवस्थापक पदावर कार्यरत आहेत. रेश्मा नेहे यांनी भारतीय शास्त्रीय नृत्य व संगीताचे विशेष शिक्षण उच्च प्रविण्यासह पुर्ण केलेले असून त्या सध्या नॉर्वे देशात आपल्या देशाची सांस्कृतिक विरासत असलेले शास्त्रीय संगीत व नृत्य संवर्धन व प्रसारण कार्य करत आहेत. त्या तेथे आपल्या शास्त्रीय संगीत व नृत्य शिक्षणासाठी कला नृत्य अकॅडमी चालवत आहेत. या अकॅडमी द्वारे भरतनाट्यम, ओडीसी, कथक, कुचिपूडी, मोहिनी पट्टम आदी शास्त्रीय नृत्य व संगीताचे प्रशिक्षण देत आहेत.

**आमच्या गावातील महिला रेश्मा नेहे पाटील यांना जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेते आणि देशाचे पंतप्रधान मोदीजी यांचे विदेशात तेथील संसदेच्या विशेष सभागृहात स्वागत, सन्मान करण्याचा आणि त्यांना भेटण्याचा बहुमान मिळणं हे आमच्या गावासाठी मानाचा तुरा असून अतिशय अभिमानाची बाब आहे..!!**

**गोरक्ष नेहे पाटील, कामगार पोलीस पाटील, सावरगाव तळ**

**भारतीय सांस्कृतिक कला व शास्त्रीय नृत्य हे जागतिक कीर्तीचे नेते अन आपल्या देशाचे मानबिंदू पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे समोर विदेशात सादर करण्याचे भाग्य लाभले. मोदीजी नी या कलेचे कौतुक केले हे माझ्या दृष्टीने गौरवास्पद आहे.**

**रेश्मा नेहे, ओस्लो, नॉर्वे**

# नीट पेपर फुटीत लातुरमधील डॉक्टर गजाआड, मुलासाठी खरेदी केला होता पेपर




लातूर (प्रतिनिधी)-

देशभरात खळबळ उडवणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने मोठी कारवाई करत लातूरमधील बालरोगतज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांना अटक केली आहे.

स्वतःच्या मुलाला परीक्षेत फायदा मिळवून देण्यासाठी त्यांनी आरोपी शिवराज मोटेगावकरकडून प्रश्नपत्रिका खरेदी केल्याचा गंभीर आरोप तपास यंत्रणांनी केला आहे. लातूरहून चौकशीसाठी पुण्यात आणल्यानंतर सीबीआयने अनेक तास कसून चौकशी केली आणि त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. या प्रकरणात विद्यार्थ्यांच्या पालकाला झालेली ही पहिली अटक असल्याने संपूर्ण तपासाला नवे वळण मिळाले आहे.

डॉ. मनोज शिरुरे हे लातूरमधील जुना औसा रोड परिसरातील सिद्धिविनायक बाल रुग्णालयाचे संचालक आहेत. सीबीआयचे पथक रविवारीपासून लातूरमध्ये तळ ठोकून असून, मोटेगावकरच्या संपर्कातील सर्व संशयितांची चौकशी सुरू आहे. शिरुरे यांच्या रुग्णालयात पोहोचलेल्या अधिकाऱ्यांनी साडेचार तास तपास केला. या दरम्यान काही महत्त्वाची कागदपत्रे, मोबाईल फोन आणि डिजिटल पुरावे जप्त करण्यात आले. प्राथमिक तपासात डॉ. शिरुरे यांचे शिवराज मोटेगावकर आणि पी. व्ही. कुलकर्णी यांच्याशी संबंध असल्याचे उघड झाले आहे. मागील काही वर्षांपासून ते या नेटवर्कच्या संपर्कात असल्याचा संशयही सीबीआयला आहे.

सीबीआयच्या तपासातून पेपरफुटीचा संपूर्ण कट अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने रचण्यात आल्याचे समोर आले आहे. मोटेगावकरने आपल्या क्लासमधील पी. व्ही. कुलकर्णी आणि मनीषा मांढरे यांना एनटीएच्या प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या पॅनलमध्ये सहभागी करून घेतल्याचा आरोप आहे. कुलकर्णी यांच्याकडे केमिस्ट्री, तर मनीषा मांढरे यांच्याकडे बायोलॉजी विषयाची जबाबदारी होती. प्रश्नपत्रिका तयार करतानाच त्यांनी प्रश्न पाठ केले आणि नंतर ते हाताने लिहून मोटेगावकरकडे पोहोचवले. त्यानंतर मोटेगावकरने हे सर्व प्रश्न पीडीएफ स्वरूपात मोबाईलमध्ये साठवून ठेवले होते.

तपासात पुढे असेही स्पष्ट झाले की, हे प्रश्न आणि उत्तरे पैशांच्या मोबदल्यात विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले जात होते. डॉ. मनोज शिरुरे यांनी स्वतःच्या मुलासाठी ही प्रश्नपत्रिका घेतल्याचा आरोप असल्याने प्रकरण अधिक गंभीर बनले आहे. सीबीआयच्या हाती आलेल्या डिजिटल पुराव्यांमुळे या रॅकेटमध्ये अनेक जण सामील असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मोटेगावकरने परीक्षा झाल्यानंतर मोबाईलमधील सर्व माहिती डिलीट करून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, सीबीआयने तांत्रिक मदतीने तो डेटा पुन्हा मिळवला आणि त्यानंतर संपूर्ण जाळे उघडकीस आले.

# ५ दिवसांत 'कॉकरोच जनता पार्टी'चा सोशल मीडियावर धडाका; १ कोटी २३ लाख फॉलोअर्स

मुंबई (प्रतिनिधी)-

अवघ्या पाच दिवसांत सोशल मीडियावर प्रचंड लोकप्रियता मिळवत 'कॉकरोच जनता पार्टी' (सीजेपी) चर्चेचा विषय ठरली आहे. या नव्या डिजिटल पक्षाने इन्स्टाग्रामवर तब्बल १ कोटी २३ लाखांहून अधिक, तर एक्सवर सुमारे १.२१ लाख फॉलोअर्स जोडले आहेत. विशेष म्हणजे, अल्पावधीतच लाखो तरुणांनी या व्यासपीठाशी नाळ जोडल्याचा दावा केला जात आहे. पक्षाचे अनोखे घोषवाक्यही तितकेच चर्चेत आले आहे - सेक्युलर, सोशलिस्ट, डेमोक्रॅटिक... लेझी!

या पक्षाच्या निर्मितीमागेही एक वेगळी पार्श्वभूमी समोर आली आहे. १५ मे रोजी काही माध्यमांमध्ये असा दावा करण्यात आला होता की, एका सुनावणीदरम्यान सीजेआय सूर्यकांत यांनी काही बेरोजगार तरुणांची तुलना कॉकरोचशी केली. या चर्चेनंतर महाराष्ट्रातील अभिजीत दीपके यांनी सोशल मीडियावर एक व्यासपीठ उभारण्याचा निर्णय घेतला आणि त्यातून 'सीजेपी'चा जन्म झाला.




या पक्षामध्ये प्रवेशासाठी काही हटके पात्रताही जाहीर करण्यात आल्या आहेत. बेरोजगार असणे, आळशी म्हणजेच निष्क्रिय राहणे, ऑनलाइन राहण्याचे व्यसन असणे आणि व्यावसायिक पद्धतीने राग व्यक्त करण्याची क्षमता असणे, या अटी पक्षाने नमूद केल्या आहेत.

दरम्यान, 'सीजेपी'च्या जाहीरनाम्यानेही सोशल मीडियावर मोठी खळबळ उडवून दिली आहे. निवृत्तीनंतर कोणत्याही सीजेआयला राज्यसभेत प्रवेश न देणे, मतदारांचे वैध मतदान हटवले तर निवडणूक आयोगावर यूएपीए अंतर्गत कारवाईची मागणी करणे, महिलांना ३३ नव्हे तर थेट ५० टक्के आरक्षण देणे, मोठ्या उद्योगसमूहांच्या मीडिया संस्थांच्या परवान्यांची चौकशी करणे आणि पक्षांतर करणाऱ्या आमदार-खासदारांना २० वर्षांची राजकीय बंदी घालणे, अशी पाच प्रमुख आश्वासने जाहीरनाम्यात देण्यात आली आहेत.

अभिजीत दीपके सध्या अमेरिकेतील बॉस्टन विद्यापीठात पब्लिक रिलेशनमध्ये मास्टर्स शिक्षण घेत असून, त्यांनी २०२० ते २०२३ दरम्यान आम आदमी पार्टीच्या सोशल मीडिया टीममध्ये स्वयंसेवक म्हणूनही काम केले आहे.

अभिजीत दीपके यांनी सांगितले की, मी सोशल मीडियावर तरुणांविषयी होत असलेल्या चर्चेकडे पाहत होतो. मी प्रश्न विचारला - जर सगळी 'कॉकरोच' एकत्र आली तर काय होईल? त्यानंतर जनरेशन झेडकडून मोठा प्रतिसाद मिळाला आणि 'सीजेपी'ची कल्पना प्रत्यक्षात उतरली.

दरम्यान, सोशल मीडियावर या पक्षाची चर्चा झपाट्याने वाढत असून, हा तरुणांच्या डिजिटल आंदोलनाचा नवा चेहरा ठरणार का, याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

# सहकार व सहकाराचे भविष्य : एक चिंतन

## आपल्या लेकराप्रमाणे सहकारी संस्था सांभाळणे गरजेचे

संत वाङ्मयात डोकावले तर जगतगुरु संत तुकाराम महाराजांचा अभंग सहज आठवतो, एकमेका सहाव्य करू.. अवघे धरू सुपंथ.. पुढील काळात सहकाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन समाजधुरीणांनी संत वचनानुसार ठेवला. डाव्या चळवळीतील काही मान्यवर, सहकार ही समाजवादाची पहिली पायरी आहे, असे समजून सहकाराकडे सकारात्मक पाहू लागले. त्यातून बहुउद्देशीय सहकारी सोसायट्यांचा जन्म झाला. आजही या सोसायट्या एम. पी. (मल्टीपर्पज) सोसायट्या म्हणून ओळखल्या जातात. सन १९०४ च्या दरम्यान ब्रिटिश काळात सहकार जन्माला आला, असे मानले जाते. प्रत्यक्षात मात्र सन १८८२ च्या सुमारास विठ्ठल कौठेकर या महाराष्ट्रीयन माणसाने बडोद्याला अनन्या सहकारी पतसंस्था सुरू केली होती. इंग्रजांनी सन १९०३-०४ च्या दरम्यान दुष्काळी परिस्थिती हाताळण्यासाठी सहकारी संस्थांचा उपयोग केला होता, हे लक्षात येते. ग्रामीण जनतेला मरूही द्यायचे नाही व नीटपणे जगूही द्यायचे नाही. व्हेंटिलेटरवरील रुग्णामारखे जिवंत ठेवायचे, इतकाच त्यांचा सहकारामागील संकुचित उद्देश होता. सेवा सोसायट्यांनीच ग्रामीण भागात सहकाराची पायाभरणी केली. प्रामुख्याने शेतकऱ्यांना पीक कर्ज देणे, शेतकऱ्यांसाठी शेती उत्पादित शेतमालाला आवश्यक साधन-सुविधा देणे, ज्यात रासायनिक खते, बी-बियाणे, विहिरी खोदण्यासाठी कर्जे, विहिरीवर पाणी उपसणाऱ्या मशिनरीला कर्ज देणे, तगाई कर्ज देणे, आदी कामे सहकारातील या संस्थांमार्फत सुरू झाली. नंतर तालुका खरेदी-विक्री संघ अस्तित्वात आला. त्यांना व्यावसायिक स्वरूपाच्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसह इतर नागरिकांच्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा पुरवठा व्यापारी उद्देशाने करण्याचे अधिकारही दिले. ग्रामीण जीवनातील सहकार व्यवस्था, शासकीय स्वस्त धान्याच्या दुकानामुळे तर सहकार जणू मायबाप ठरावा, अशा स्थितीला पोहोचला.

स्वातंत्र्यानंतर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू असे सांगत होते की, गावात जिथे मंदिर असेल तिथे जवळ शाळा असावी, तसेच गावांत सहकारी सेवा सोसायटी असावी. या सेवा सोसायट्यांना अर्थपुरवठा करणाऱ्या जिल्हा सहकारी बँका अस्तित्वात आल्या व वेगाने वाढल्याही. सहकाराची मातृसंस्था तसेच शिखर संस्था म्हणून बँकांचे स्थान निर्माण झाले. या सहकारी संस्थांनी शेतकरी व कार्यकर्त्यांकडून जोरदार प्रयत्न केले. १९६० मध्ये महाबळेश्वर येथे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या अभ्यास शिबिराला मार्गदर्शन करताना कृषी औद्योगिक क्रांतीची घोषणा मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी केली. १९५० मध्येच धनंजयराव गाडगीळ, मेहता, स्व. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकारी तत्त्वावर आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना सुरू केला. त्यानंतर विशेष करून स्वातंत्र्य चळवळीतील स्वातंत्र्ययोद्ध्यांनी सहकार चळवळ भक्कम पायावर उभी केली. साखर कारखाने, सूतगिरण्या, ऑईल मिल, दूध संघ व साखर उद्योगातील इतर पूरक उपपदार्थ निर्मितीचे युनिट सुरू झाले.


श्री. मधूकरराव नवले

धवलक्रांतीचे सह-दूध सोसायटी ते सहकारी संघांनी शेतीला पूरक दुग्धव्यवसायाला बळ दिले. ग्रामीण महाराष्ट्रात दुग्धउद्योगाला नवीन अस्तित्व मिळवून दिले. ग्रामपातळीपासून नागरिकांचा विश्वास संपादित केला. सहकारी संस्था ग्रामीण जनतेची सावली व माऊली ठरली. सावकारशाहीचे पाश तोडण्यात सहकारी व्यवस्थेने मोलाची कामगिरी बजावली. सन १९५० च्या पुढे सहकारी क्षेत्रातील विविध संस्थांचे जाळे विणण्याचा प्रयत्न झाला. राज्य पातळीपर्यंत सहकारी संस्था जन्माला घालून त्यांची कडीत कडी अडकवून साखळी तयार करण्यात आली. सहकाराने ग्रामीण जनतेची एक वज्रमूठ तयार केली. सरकार व सहकार हीच ग्रामीण विकासाच्या रथाची दोन चाके ठरली. सर्वांगीण विकासाचे नवे बदललेले चित्र महाराष्ट्रात तयार झाले. त्यावर अवलंबून शिक्षण संस्था आल्या. स्व. वसंतदादा यांच्या दूरदृष्टीने उभ्या राहिलेल्या शिक्षण संस्थांनी ग्रामीण भागात शिक्षित तरुणांची नवी पिढी जन्माला घातली.

स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या विचारधारेतून सहकाराचे स्वरूप त्यांनीच व्यक्त केले होते. हे असे की, सहकारी क्षेत्रातील मान्यवरांचा सहकार हाच ध्यास, सहकार हाच श्वास, असे जीवनाचे सामाजिक क्षेत्रात व्रतस्थ नेत्यांनी याच घोषवाक्यानुसार जीवनातील ध्यासपर्व सहकाराला मानले. सन २००० पर्यंत सहकाराचे पर्व एका सामाजिक उद्देशाने व निकोप वातावरणात वाढत गेले. खासगी साखर कारखाने किंवा इतर खासगी उद्योग स्वाभाविकपणे बंद पडले. सोमय्या, डहाणूकर व इतर खासगी उद्योगांचे मालक व अनुषंगिक भांडवलदारी व्यवस्थेचे स्वरूप बदलून गेले. सहकाराचे माहेर तसेच सहकारी संस्था चालविणारे काही हजार विश्वस्त व लाखो कर्मचारी, कामगार यांचा रोजगार सहकारामधून निर्माण झाला. याचा परिणाम व्यापारावर फारच चांगला झाला, अर्थकारण सुधारले. एका सहकारी उद्योगातून अनेक नवी नगरे उभी राहिली. शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन आले. भौतिक सुविधा कुटुंबात निर्माण झाल्याचे स्पष्ट दिसू लागले. सहकार आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचे साधन ठरले. स्वावलंबनाला सहकाराने शक्ती दिली. सहकार सामर्थ्याचे स्वरूप प्रत्यक्षात समाजात दिसू लागले. सामाजिक व आर्थिक क्रांतीला परिवर्तनाच्या उद्देशापर्यंत पोहोचविणाऱ्या त्या विशेष कालावधीतील एका पिढीला निकष प्राप्त झाले. महाराष्ट्राचे सामाजिक-आर्थिक चित्र बदलले. गुजरातसह इतर मोजक्या राज्यातही सहकार व्यवस्था निर्माण झाली.

ज्यांनी या परिवर्तनाची गुढी उभारून ग्रामीण जनतेमध्ये स्वावलंबन नांदते केले, त्यांनी आपले सहकार अभियान किंवा शिवकालीन भाषेतील एक मोहीम फत्ते केली. शिवकालाचेच उदाहरण घेऊन सहज लक्षात आणून देता येईल, छत्रपती शिवाजी महाराजांनंतर छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज व ताराबाई आणि त्यांच्या लढाऊ शिलेदारांनी प्राणाची आहुती देऊन स्वराज्य सांभाळले. सहकार व्यवस्थेबाबत मात्र सहकाराचे स्वतंत्र राज्य त्यांनी निर्माण केले. त्यांच्या नंतर, अपवाद वगळता, सहकारी संस्थांचे उभे असलेले संस्थात्मक राज्य त्यांच्या अनुयायांना सांभाळता आले नाही. त्याचे कारण स्पष्ट आहे. सहकार केवळ सहकारी कायदा किंवा संस्थांच्या पोटनियमांवर चालत नाही. सहकारी संस्था चालतात, वाढतात त्या सहकारी संस्थांच्या नेतृत्वावर. उदाहरण द्यावयाचे झाल्यास साखर कारखानदारीचे देता येईल. विपुल ऊस कार्यक्षेत्रात असून कारखाने बंद का पडले, गरजेइतका ऊस नसूनही माळरानावर साखर कारखाने दिमाखात का चालले? एका कारखान्याचा साखर उत्पादनाचा खर्च नियंत्रणात मर्यादित राहतो, तर त्याच साखर कारखान्यांचा साखर उत्पादनाचा खर्च काही पटीने अधिक का असतो? योग्य वेळी निर्णय घेण्याची नेतृत्वाची क्षमता, त्यासाठी प्रशासकीय व कारखानदारीचे तांत्रिक ज्ञान आत्मसात करणे, साखर विक्री व्यवस्थापन, इत्यादी बाबी महत्त्वाच्या आहेत.

खरंतर स्पष्टच बोलायचे झाल्यास, शेतकरी सभासदांचे अपत्य म्हणजे सहकारी संस्था आहे. या अपत्याला सांभाळणे ही विश्वस्त या नात्याने आपली जबाबदारी असते. आपण सत्ता हाती येताच हे विसरतो. याची जाणीव आपण ठेवत नाही की, शेतकरी अगर ग्रामीण जनतेचा आधार असलेल्या या संस्था चालविताना संस्था हे साधन आहे, तर सभासदांच्या कष्टाला न्याय देण्यासाठी आपण विश्वस्त म्हणून काम करायचे, हे आपले साध्य आहे. सरकार व निसर्ग यांचे सकारात्मक सहकार्य मिळणे अत्यावश्यक आहे. सरकार पाठीशी असेल, तरच सहकारी संस्था टिकतील, ही वस्तुस्थिती आहे. प्रामाणिक, निकोप व सामाजिक भान राखणे हे सहकारातील प्रत्येक पदाधिकाऱ्यांची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे. याची जाणीव ठेवून काम करणारा नेता, कार्यकर्ता संस्थेस लाभेल, तरच सहकार व सहकारी संस्था टिकेल. बँका असोत की पतसंस्था, गावची सोसायटी असो की दूध संस्था, एकूणच सहकार हा शासनाचे धोरण व सहकारी क्षेत्रातील नेते आणि कार्यकर्त्यांनी संस्था म्हणजे आपल्या पोटी जन्माला आलेले लेकरू समजून त्याला सांभाळले, तरच आजचा अडचणीतला सहकार सावरणार आहे.

**मधुकरराव नवले, संस्थापक**
**बुवासाहेब नवले पतसंस्था व मल्टिस्टेट**

**शब्दांकन : प्रा. विद्याचंद्र सातपुते**

# संपादकीय...

## दहशतवादमुक्त जगासाठी जागतिक एकजूट आवश्यक

२१ मे हा दिवस भारतासाठी केवळ माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनाचा नाही, तर दहशतवादाच्या भीषण वास्तवाची आठवण करून देणारा दिवस आहे. १९९१ मध्ये तामिळनाडूतील श्रीपेरंबदूर येथे प्रचारसभेदरम्यान झालेल्या आत्मघाती बॉम्बस्फोटात राजीव गांधी यांची हत्या झाली आणि संपूर्ण देश हादरून गेला. त्यापूर्वी १९८४ मध्ये इंदिरा गांधी यांची हत्या झाली होती. या दोन्ही घटना केवळ व्यक्तींवरील हल्ले नव्हते, तर भारताच्या लोकशाही व्यवस्थेवर आणि सार्वभौमत्वावर झालेले गंभीर आघात होते. म्हणूनच २१ मे हा दिवस दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन म्हणून पाळला जातो. आज तीन दशकांहून अधिक काळ उलटल्यानंतरही जग दहशतवादाच्या छायेतून पूर्णपणे मुक्त होऊ शकलेले नाही. उलट दहशतवादाचे स्वरूप अधिक व्यापक, तांत्रिक आणि धोकादायक बनले आहे. दहशतवाद हा कोणत्याही एका देशापुरता किंवा एका धर्मापुरता मर्यादित विषय राहिलेला नाही. आज जगातील जवळपास प्रत्येक देशाला दहशतवादाची झळ बसत आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, रशिया, इस्राईल, श्रीलंका, जर्मनी, जपान, ऑस्ट्रेलिया यांसारख्या प्रबळ राष्ट्रांनाही दहशतवादी हल्ल्यांचा सामना करावा लागला आहे. अमेरिकेतील ११ सप्टेंबरचा हल्ला, फ्रान्समधील पॅरिस हल्ले, रशियातील हिंसाचार किंवा श्रीलंकेतील ईस्टर बॉम्बस्फोट या घटना जगाला हादरवून गेल्या. भारत तर गेल्या अनेक दशकांपासून सातत्याने दहशतवादाचा सामना करत आहे. जम्मू-काश्मीरपासून मुंबईपर्यंत आणि ईशान्य भारतापासून नक्षलग्रस्त भागांपर्यंत विविध स्वरूपातील दहशतवाद देशाला पोखरत आहे. मागील वर्षी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर देशभर संतापाची लाट उसळली. भारताने ऑपरेशन सिंदूरसारख्या कारवायांद्वारे कठोर प्रत्युत्तर दिले, मात्र दहशतवाद्यांची मानसिकता बदलली नाही. कारण दहशतवादाचे मूळ केवळ शस्त्रांमध्ये नसून विचारसरणीत दडलेले आहे. दहशतवादाचा सर्वात मोठा धोका म्हणजे तो धर्म, जात, भाषा किंवा राष्ट्रवादाच्या नावाखाली तरुणांची दिशाभूल करतो. आजचे दहशतवादी हे अशिक्षित किंवा अडाणी नसतात. अनेकदा उच्चशिक्षित, तांत्रिक ज्ञान असलेले तरुण चुकीच्या विचारसरणीच्या प्रभावाखाली येतात. सोशल मीडियाच्या माध्यमातून धार्मिक कट्टरता, द्वेष आणि हिंसेचा प्रचार केला जातो. श्रद्धा, अस्मिता आणि अन्यायाच्या नावाखाली तरुणांचे ब्रेनवॉश केले जाते. बेरोजगारी, सामाजिक असमानता, राजकीय उपेक्षा, धार्मिक कट्टरता आणि आर्थिक विषमता ही दहशतवादाला पोषक परिस्थिती निर्माण करणारी कारणे आहेत. जेव्हा एखाद्या समाजघटकाला न्याय मिळत नाही किंवा स्वतःचे अस्तित्व धोक्यात असल्याची भावना निर्माण होते, तेव्हा त्यातून अतिरेकी विचारसरणीला खतपाणी मिळते. म्हणूनच दहशतवादाचा मुकाबला केवळ लष्करी कारवाईने होऊ शकत नाही, तर सामाजिक न्याय, शिक्षण, रोजगार आणि लोकशाही मूल्यांची जोपासना यांद्वारेही तो करावा लागतो. दहशतवादाविरोधातील लढाई ही केवळ सरकार, सुरक्षा यंत्रणा किंवा सैन्याची जबाबदारी नाही. प्रत्येक नागरिकाने सतर्क आणि जबाबदार राहणे अत्यंत आवश्यक आहे. संशयास्पद हालचाली, अफवा किंवा अतिरेकी प्रवृत्ती आढळल्यास तातडीने सुरक्षा यंत्रणांना माहिती देणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. देशाच्या सुरक्षेसाठी जनतेचा सहभाग तितकाच महत्त्वाचा असतो. कारण दहशतवादी संघटना सामान्य समाजातच आपले जाळे निर्माण करतात. नागरिक जागरूक राहिले, तर अनेक संभाव्य हल्ले रोखता येऊ शकतात. त्याचबरोबर समाजात धार्मिक सलोखा, बंधुता आणि संविधानिक मूल्यांबद्दल जागृती निर्माण करणेही तितकेच गरजेचे आहे. आज जगातील महासत्तांनीही दहशतवादाबाबत दुटप्पी भूमिका सोडण्याची गरज आहे. काही राष्ट्रे स्वतःच्या राजकीय किंवा सामरिक हितासाठी काही अतिरेकी संघटनांकडे दुर्लक्ष करतात किंवा त्यांना अप्रत्यक्ष पाठबळ देतात. ही भूमिका अखेरीस संपूर्ण मानवजातीसाठी घातक ठरते. दहशतवादाला कोणताही धर्म, जात किंवा राष्ट्र नसते. तो मानवतेचा शत्रू आहे. त्यामुळे दहशतवादाविरुद्ध सर्व देशांनी एकत्रितपणे कठोर धोरण स्वीकारणे आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघासह जागतिक संघटनांनी अधिक प्रभावी भूमिका घेणे गरजेचे आहे.

## संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. डॉ. सागर यमनाजी वाल्हेकर, म्यु.घ.नं. -, सि. स. नं. - ४०७९ /ब, स. नं. १५१ (८०५)/११६ या ठिकाणी मध्ये स्पर्श बालरुग्णालय चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. २०/०५/२०२६ मुख्याधिकारी - संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

# आदिवासी प्रकल्प राजूर येथे 'जनजातीय गौरव उत्सवा'चा शुभारंभ!




युवावार्ता (अकोले प्रतिनिधी)- आदिवासी बांधवांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांना शासकीय योजनांचा थेट लाभ मिळवून देण्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर (अहिल्यानगर) येथे 'जनजातीय गौरव उत्सवा'चे भव्य उत्साहात उद्घाटन करण्यात आले. केवळ एक उत्सव नव्हे तर दुर्गम भागातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय, सेवा आणि हक्क पोहोचवणारी एक मोठी मोहीम म्हणून या कार्यक्रमाकडे पाहिले जात आहे.

उत्सवाच्या पहिल्याच दिवशी आदिवासी बांधवांना विविध आवश्यक दाखले आणि ओळखपत्रांचे थेट वाटप करण्यात आले या मध्ये आधारकार्ड, रेशन कार्ड, आणि नवीन मतदार नोंदणी. आर्थिक व शेतीविषयक दाखले,उत्पन्न दाखले, जातीचे दाखले आणि शेतकरी ओळखपत्र अधिकार आणि हक्कः विविध शासकीय योजनांचे मंजुरी पत्र आणि लाभार्थ्यांना थेट लाभ देणेत आला.

यावेळी दुर्गम भागातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य तपासणी, रक्त तपासणी आणि औषधोपचार करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात जल, जंगल आणि जमिनीच्या रक्षणासाठी बलिदान देणाऱ्या महान आदिवासी क्रांतीकारकांना अभिवादन करून झाली. या महोत्सवाला आ. डॉ किरण लहामटे, प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे, नायब तहसीलदार प्रमोद सावंत, श्रीमती गवारी, शासकीय कर्मचारी आणि आदिवासी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक गंगाराम करवर यांनी केले तर आभार सहाय्यक प्रकल्प अधिकारी तुषार पवार यांनी मानले.

## महाराष्ट्र शासन
### सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
### उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर

यांचे कार्यालय, यशवंतराव चव्हाण प्रशासकीय भवन, तिसरा मजला, नवीन नगर रोड, संगमनेर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर

ई-मेल आय डी -: dr_sangmner@rediffmail.com

सत्यमेव जयते

जा.क्र वि-१/श्रमिक बि. शे. पतसंस्था/जाहीर समन्स/कलम १०१/सन २०२६ दिनांक २०/०५/२०२६

**-: जाहीर समन्स नोटीस :-**

ज्याअर्थी वादी : श्रमिक ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. गुंजाळवाडी पठार, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर यांनी प्रतीवादी यांचे विरुध्द या कार्यालयात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये प्रमाणपत्र मिळणे कामी दावा दाखल केला आहे व वसुली प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी खाली नमुद प्रतिवादी यांना नैसर्गिक न्यायतत्त्वाच्या दृष्टीने नोटीस देण्यात येते की, आपण वार मंगळवार दिनांक २६/५/२०२६ रोजी सकाळी. ११.०० वाजता उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर, यशवंतराव चव्हाण प्रशाकिय भवन, तिसरा मजला, नविन नगर रोड, संगमनेर या कार्यालयात सदर दाव्यामध्ये लेखी तोंडी म्हणणे देणे कामी हजर राहावे. सदर दिवसी व वेळेत आपण हजर न राहील्यास अथवा लेखी म्हणणे आपण सादर न केल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

| अ. क्र. | दावा क्रमांक | प्रतीवादी (कर्जदार व जामिनदार) | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ७४/२०२४ | १. कर्जदार : सौ. काळे सुमन विष्णु मु.पो. पोखरी बाळेश्वर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>२. जामिनदार : श्री. फटांगरे किसण आप्पासाहेब मु.पो. पोखरी बाळेश्वर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>३. जामिनदार : श्री. घोगरे शांताराम यशवंत मु.पो. पोखरी बाळेश्वर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर | १,२८,२६/- |
| २ | ७४/२०२४ | १. कर्जदार : श्री. काळे किसण प्रल्हाद मु.पो. पोखरी बाळेश्वर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>२. जामिनदार : श्री. फटांगरे मच्छिंद्र लहानु मु.पो. पोखरी बाळेश्वर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>३. जामिनदार : सौ. फटांगरे लिलाबाई किसण मु.पो. पोखरी बाळेश्वर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर | २,७६,९९२/- |
| ३ | ७९/२०२४ | १. कर्जदार : श्री. काळे विष्णु प्रल्हाद मु.पो. पोखरी बाळेश्वर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>२. जामिनदार : श्री. फटांगरे किसन आप्पासाहेब मु.पो. पोखरी बाळेश्वर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>३. जामिनदार : श्री. घोगरे शांताराम यशवंत मु.पो. पोखरी बाळेश्वर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर | १,१८,१२६/- |
| ४ | ८०/२०२४ | १. कर्जदार : श्री. गुंजाळ नवनाथ जगन्नाथ मु.पो. खांडगांव ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>२. जामिनदार : श्री. मंडलिक राजेंद्र गंगाधर मु.पो. रायतेवाडी ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>३. जामिनदार : श्री. गोफणे नारायण काशिनाथ मु.पो. खांडगांव ता. संगमनेर जि. अहिल्यानगर | ५६,४४५/- |

ही नोटीस आज दिनांक २०/०५/२०२६ रोजी माझे सही व कार्यालयाच्या मुद्रेसह दिली आहे.

(संतोष कोरे)
उपनिबंधक,
सहकारी संस्था, संगमनेर

# निळवंडे पाटपाणी कृती समितीच्यावतीने ह.भ.प उद्धव महाराज मंडलिक यांचा सत्कार



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शेतकरी नेहमीच विविध नैसर्गिक संकटांना सामोरे जात असतो त्यातच आता महागाई प्रचंड प्रमाणात वाढली असून यामुळे शेतकरी व कामगार मोठे हवालदिल झाले आहे. त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून त्यांच्या या व्यथा ह. भ. प. उद्धव महाराज मंडलिक (नेवासेकर) हे किर्तनरुपी समाज प्रबोधनाच्या माध्यमातून सतत मांडत असतात. म्हणून त्यांचा निळवंडी पाट पाणी कृती समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

निळवंडे पाट पाणी कृती समिति नगर व नाशिक यांच्या वतीने महाराजांना या कार्याबद्दलचे अभिनंदन पत्र देण्यात आले यावेळी समितीचे संस्थापक अध्यक्ष नानासाहेब शेळके, उपाध्यक्ष उत्तमराव घोरपडे, समितीचे ज्येष्ठ मार्गदर्शक गायकवाड गुरुजी, सदस्य विलासराव गुळवे, विजय मगर यांस असंख्य शेतकरी उपस्थित होते.

या पत्रात म्हटले आहे की, ह. भ. प. उद्धव महाराज मंडलिक हे कीर्तन रुपी समाज प्रबोधन करीत आहे. या कीर्तनाच्या माध्यमातून शेतकरी कामगार यांच्या व्यथा मांडण्याचे काम करीत आहे. त्यामुळे सरकारचेही ते लक्ष वेधत आहे. उद्धव महाराज यांच्या किर्तनसेवेत विज्ञाननिष्ठ व शास्त्रोक्त पद्धतीने समाजातील अंधश्रद्धा व अंधरुढींचे निर्मूलन होत आहे. संत गाडगेबाबा संत तुकडोजी महाराज ,संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर या सर्व संतांचे बोल ओजस्वी वाणीतून आपल्या कीर्तनातून ते समाजापुढे मांडत असून विविध घटकांच्या व शेतकऱ्यांच्या, तरुणांच्या वेदना सरकारपर्यंत पोहोचवण्याचे काम ते कीर्तनाच्या माध्यमातून करत आहे.

# "समाधान समारोह" मोहिमेतून न्यायालयातील १५ वर्षे जुन्या वादात सामोपचाराने तडजोड

अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)- न्याय प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढवून न्याय आपल्या दारी ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या वतीने समाधान समारोह या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २१, २२ व २३ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित विशेष लोकअदालतीच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या तडजोडपात्र प्रकरणांचा संमतीने व सलोख्याने निपटारा करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. जिल्ह्यातील ज्या पक्षकारांची तडजोडपात्र प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत, त्यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा जिल्ह्यातील कोणत्याही तालुका न्यायालयाशी संपर्क साधून विशेष लोकअदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे, तसेच सचिव योगेश पैठणकर यांनी केले आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेले वांजोळी येथील वादी सचिन पंढरीनाथ दळवी व इतर विरुद्ध प्रतिवादी कडूबाई भारतपुरी गोसावी यांच्यातील केस क्रमांक ५८७९/२०२३ हे प्रकरण तडजोडीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहिल्यानगर यांच्याकडे पाठविण्यात आले होते. दोन्ही पक्षकारांना नोटीस बजावल्यानंतर ते प्रत्यक्ष उपस्थित राहिले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेश पैठणकर यांनी दोन्ही पक्षकारांशी सविस्तर चर्चा करून सामंजस्य निर्माण केले. दोन्ही बाजूंनी सकारात्मक भूमिका घेतल्याने तब्बल १५ वर्षांपासून सुरू असलेला वाद सामोपचाराने मिटविण्यात यश आले. या प्रक्रियेत ड. श्री. आघाव यांनीही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. दीर्घकाळ प्रकरण प्रलंबित राहिल्यामुळे संबंधित पक्षकारांना मानसिक, तसेच आर्थिक त्रास सहन करावा लागत होता. मात्र, लोकअदालतीच्या माध्यमातून परस्पर सहमतीने प्रश्न मार्गी लागल्याने दोन्ही पक्षकारांनी समाधान व्यक्त केले. याबाबत अधिक माहितीसाठी ८५९१९०३६१६ या भ्रमणध्वनी क्रमांकावर अथवा डीएलएसएनगरजीमेल.कॉम या ईमेलवर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.


READ E- NEWS ON Yuvavarta.in
SUBSCRIBE TO OUR YOUTUBE CHANNEL


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
AMOL VITTHAL NAVALE
NEW NAME AS
AMOL VITTHAL NAWALE
BY AFFIDAVIT NO 577/2026
DATE 18/05/2026
ADD- A/POST - MALDAD, TAL - SANGAMNER, DIST. AHILYANAGAR, MAHARASHTRA


**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५



**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**त्वरित पाहिजेत**
पेट्रोल पंप वर २ कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक उमेदवारांनी संपर्क करावा
पत्ता - चैतन्य पेट्रोलियम, संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी
8888808397

**पाहिजेत**
स्वयंपाकीन - ०१ (२ व्यक्तींचा स्वयंपाक)
ड्रायव्हर - ०१
क्लार्क - ०१ (लेडीज/जेन्ट्स)
वॉचमन - ०१
अनुभवास प्राधान्य
9822334431

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६








# तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेला पाणी सुटले, तळेगावसह २१ गावांना मोठा दिलासा

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुक्यातील तळेगावसह २१ गावांसाठी जीवनदायिनी ठरणारी तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना अखेर कार्यान्वित झाली. जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी पाणी येण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या दिलेल्या सूचना आणि आमदार अमोल खताळ यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे अनेक वर्षांपासून रखडलेल्या या योजनेला प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे.

या योजनेबाबत ठेकेदारांनी लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांची दिशाभूल करून जाणीवपूर्वक राजकारण सुरू करून काम बंद ठेवले होते. पाणीपुरवठा योजनेमध्ये असणाऱ्या तांत्रिक अडचणी, ठेकेदाराचा मनमानी कारभार, तसेच पूर्वीच्या कामकाजात अनियमितता यांमुळे अनेक वर्षे ही पाणीपुरवठा योजना बंद पडलेली होती. परिणामी, तळेगावसह २१ गावांतील नागरिक, विशेषतः महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत होती. योजनेच्या पाइपलाईनच्या कामात निर्माण झालेल्या सर्व अडथळ्यांवर मात करून अखेर प्रवरा नदीचे पाणी वडगाव पान येथील साठवण तलावात सोडण्यात आले. आमदार अमोल खताळ यांनी महायुती कार्यकर्त्यांसमवेत वडगाव पान येथील साठवण तलावावर जाऊन पाहणी करत जलपूजन केले. या योजनेच्या पंप हाऊसमधील मोटारीचे बटन दाबून वडगाव पान, तसेच तीगाव माथ्यावरील टाक्यांमध्ये पाणी सोडण्यात आले.

या भागातील नागरिकांची पाण्याची अडचण दूर व्हावी, म्हणून मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी कोल्हेवाडी येथील तांत्रिक अडचणी दूर करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या होत्या. डॉ. सुजय विखे पाटील यांचेही या कामासाठी मोठे सहकार्य मिळाले. परंतु, पाणी मिळू द्यायचे नाही म्हणून पाइपलाईनच्या कामातही अडथळे आणण्याचा प्रयत्न झाला. मात्र, राज्यातील महायुती सरकार पाणी देणारे सरकार असल्यामुळे योजनेला पाणी देण्याचा शब्द आम्ही पूर्ण केला असल्याचे आ. खताळ म्हणाले. काही लोकांनी वीज बिल रखडल्याचे कारण पुढे करून ही योजना अनेक वर्षे बंद ठेवली. या परिस्थितीस जबाबदार कोण, याचे आत्मपरीक्षण त्यांनी करावे, अशी टीका करत या योजनेचे थकीत वीज बिल शासनाकडून माफ करण्यासाठी पाठपुरावा सुरू असून, यासाठी विधानसभेत आवाज उठवला आहे. हा प्रश्नही लवकरच मार्गी लागेल, असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

### जनतेची दिशाभूल थांबवावी – आ. खताळ

गेल्या चाळीस वर्षांत सत्तेत राहूनही जनतेला नियमित पाणी देता आले नाही, हे मोठे अपयश आहे. आता टेस्टिंगच्या नावाखाली अधिकाऱ्यांशी संगनमत करून आपल्या कार्यकर्त्यांकडून पाणीपूजन करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला गेला. योजना बंद पडली होती, तेव्हा त्यांनी कोणते प्रयत्न केले होते? असा सवाल उपस्थित करत आमदार खताळ यांनी राज्यातील महायुती सरकार जनतेला कायमस्वरूपी आणि शाश्वत पाणीपुरवठा करण्यासाठी कटिबद्ध आहे, असे सांगितले.



कथित भ्रष्टाचाराची चौकशी होणार

तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेत मागील काळात झालेल्या कथित भ्रष्टाचाराची चौकशी केली जाणार आहे. तसेच, या योजनेसाठी कार्यरत असलेली जुनी समिती पालकमंत्री विखे पाटील यांनी यापूर्वीच बरखास्त केली असून, लवकरच नव्या समितीची नियुक्ती करण्यात येणार असल्याचे यावेळी आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

# तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे नवीन लोकप्रतिनिधींनी श्रेय घेऊ नये - सचिन दिघे

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

तळेगाव १६ गावे पाणीपुरवठा योजना ही लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून सुरू झाली. तालुक्याच्या अगदी टोकावर या योजनेमुळे पिण्याचे पाणी मिळाले. मात्र, मागील दीड वर्षापासून नवीन सत्ताधाऱ्यांच्या कार्यकाळात ही योजना पूर्णपणे बंद होती. जनतेचे पाण्यासाठी हाल होत होते. अशावेळी नागरिकांच्या मागणीवरून माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी विशेष प्रयत्न केल्याने ही योजना चालू झाली असल्याचे सचिन दिघे यांनी म्हटले असून, नवीन लोकप्रतिनिधींना अजून योजना सुद्धा माहिती नाही, तरी श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असल्याची टीका माजी सभापती अविनाश सोनवणे यांनी केली आहे.

तळेगाव दिघे येथील चौफुलीवर या भागातील सर्व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन नवीन लोकप्रतिनिधी, ज्यांना या योजनेची माहिती नाही, त्यांनी न केलेल्या कामाचे श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करू नये, असे आव्हान केले आहे. यावेळी बोलताना माजी अध्यक्ष, ज्येष्ठ नेते प्रभाकर कांदळकर म्हणाले की, तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना ही माजी मंत्री थोरात यांच्या संकल्पनेतून सुरू झाली. तालुक्याच्या टोकावर असलेल्या देवकवठे गावापर्यंत या योजनेचे पाणी वेळेत पोहोचत होते. ज्या ज्या वेळेस अडचण आली, त्या त्या वेळेस थोरात सहकारी साखर कारखान्याची यंत्रणा तातडीने दाखल होऊन पाणीपुरवठा सुरळीत करायची. अनेक वेळा वीजबिल थकले. त्यावेळेस माजी मंत्रीथोरात यांनी विविध निधीच्या माध्यमातून वीज बिल भरून ही योजना सुरू ठेवली. मात्र, मागील दीड वर्षापासून ही योजना बंद आहे. इतक्या दिवस यांना हे का सुचले नाही, असा सवाल त्यांनी विचारला.



### मागील दीड वर्ष सत्ताधारी झोपले होते का – कांदळकर

तळेगाव भागाची जीवनवाहिनी असलेल्या या योजनेचे पाणी मागील दीड वर्षापासून गावांमध्ये येत नाही. त्यामुळे महिला नागरिक पाण्यासाठी वणवण करत आहेत. सातत्याने पाण्याची मागणी होत असताना सध्याचे सत्ताधारी झोपले होते का, असा सवाल करताना हे काम बाळासाहेब थोरात यांनी केले आहे. त्यामुळे कोणीही याचे श्रेय घेऊ नये, असे स्पष्ट मत अनिल कांदळकर व योगेश सोनवणे यांनी व्यक्त केले आहे.

सचिन दिघे म्हणाले की, महायुतीचे कार्यकर्ते व पालकमंत्र्यांचे समर्थक असलेले कोल्हेवाडीमधील अनेक लोकांनी योजनेची जाणीवपूर्वक अडवणूक केली. याबाबत तळेगाव भागातील सर्व कार्यकर्त्यांनी माजी मंत्रीथोरात यांच्याकडे पाठपुरावा केल्यानंतर स्वतः थोरात यांनी संबंधित शेतकऱ्यांना फोन करून त्यांची मनधरणी केली. यावेळी त्यांनी संमती दिली. या कामांमध्ये नवीन लोकप्रतिनिधी कुठेही नव्हते. सभापती अविनाश सोनवणे म्हणाले की, नवीन लोकप्रतिनिधी हे फक्त श्रेय घेण्यासाठी पुढे येत आहेत. त्यांना अजून योजना सुद्धा माहिती नाही. ते पहिल्यांदाच या योजनेचे काम पाहण्यासाठी आले आहेत. त्यांचे कार्यकर्ते पाठपुराव्यासाठी व या योजनेच्या कामांमध्ये योगदानासाठी होते का, हा प्रश्न विचारताना जनतेला सर्व माहीत असल्याचे ते म्हणाले.

सरपंच जनार्दन कासार म्हणाले की, काकडवाडीला दीड वर्षापासून पिण्याचे पाणी नाही. योजना बंद आहे. जे समर्थक त्याठिकाणी होते, ते एकदा तरी पाण्याच्या मागणीसाठी आले का, हा सवाल त्यांनी विचारला. सुनील उकिरडे म्हणाले की, सध्याचे सत्ताधारी यांचे या योजनेमध्ये कोणतेही योगदान नाही. फक्त फोटोसाठी येणारी ही मंडळी आहे.

# महाराष्ट्रात होणार २५ हजार ४०० मेगावॅट अणुऊर्जा निर्मिती



मुंबई (जिल्हा माहिती कार्यालय)-

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवण्यासोबतच देशात 'शून्य कार्बन उत्सर्जन करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महाराष्ट्र राज्याने मंगळवारी ऐतिहासिक आणि क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. राज्यात तब्बल २५ हजार ४०० मेगावॅट अणुऊर्जा निर्मितीचा मार्ग मोकळा झाला असून, या क्षेत्रात तब्बल ६ लाख ५० हजार कोटी रुपयांची महागुंतवणूक होणार आहे. स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात महाराष्ट्रात येणारी ही गुंतवणूक देशाला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवण्यासाठी निश्चितच मोठे बळ देणारी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच, राज्यात अणुऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांना शासन पूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

मंत्रालयात आयोजित एका विशेष बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत देशातील चार दिग्गज कंपन्यांसोबत या ऐतिहासिक सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी पारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, एनटीपीसी लिमिटेडचे मुख्य महाव्यवस्थापक ए. पी. सामल, अदानी पॉवर कंपनीचे बिझनेस हेड विवेक शर्मा, आणि रिलायन्स इंडस्ट्रीजच्या न्यूक्लिअर एनर्जी बिझनेसचे अध्यक्ष रंजय शरण प्रामुख्याने उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस आणि अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्या उपस्थितीत संबंधित कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये करारांचे अधिकृत आदान-प्रदान करण्यात आले.

मुख्यमंत्री म्हणाले, स्वच्छ आणि हरित ऊर्जा निर्मितीमध्ये अणुऊर्जा हा अत्यंत महत्त्वाचा आणि शाश्वत घटक आहे. या क्षेत्रात होत असलेल्या गुंतवणुकीमुळे महाराष्ट्र ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर आणि अधिक वेगवान बनेल. ही गुंतवणूक केवळ वीज निर्मितीपुरती मर्यादित नसून, यामुळे राज्यातील तरुणांसाठी १ लाख २३ हजारांहून अधिक रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत. स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये महाराष्ट्र नेहमीच देशात अग्रेसर राहील.

# एसएमबीटीच्या डॉक्टरांची मोठी कामगिरी
# बालकाच्या पोटातून काढला अविकसित गर्भ

नाशिक (प्रतिनिधी)-

वैद्यकीय क्षेत्रात अत्यंत दुर्मिळ मानली जाणारी 'फिटस इन फिटू' ही शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात डॉक्टरांना यश आले आहे. बालरोग शस्त्रक्रिया तज्ञ डॉ. अंजली चितळे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने एका चिमुरड्याच्या पोटातील अविकसित अर्भकाचे अवशेष यशस्वीरित्या बाहेर काढून त्याला जीवदान दिले. जगभरात अशा प्रकारच्या अत्यंत मोजक्या केसेसची नोंद असून या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे वैद्यकीय वर्तुळासह सर्व स्तरातून या कामगिरीचे कौतुक होत आहे.



अधिक माहिती अशी की, एका बालकाला पोट फुगणे सतत होणाऱ्या उलट्या आणि दूध न पचणे अशा तक्रारींमुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्राथमिक तपासणीत पोटात मोठी गाठ असल्याचे दिसून आले, मात्र सखोल रेडिओलॉजिकल चाचणीत या बाळाच्या पोटातील रेट्रोपेरिटोनियम भागात एका दुसऱ्या अविकसित मानवी अर्भकाचे अवशेष असल्याचे निदान झाले. ही शस्त्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची होती, कारण त्या अर्भकाचा रक्तपुरवठा मुख्य बाळाच्या रक्तवाहिन्यांशी जोडलेला होता. एसएमबीटी हॉस्पिटलच्या तज्ञांनी कौशल्याने बाळाच्या महत्त्वाच्या अवयवांना कोणताही धक्का न लावता हे अवशेष वेगळे केले. बाहेर काढलेल्या अवशेषांमध्ये पाठीचा कणा आणि हात-पायांची प्राथमिक रचना विकसित झाल्याचे दिसून आले होते. त्या म्हणाल्या, 'फिटस इन फिटू' ही स्थिती अत्यंत दुर्मिळ श्रेणीत येते. जागतिक आकडेवारीनुसार, दर ५ लाख जिवंत जन्मांमागे केवळ एका बालकात ही विसंगती आढळू शकते. १८ व्या शतकात पहिल्यांदा या स्थितीचे वर्णन झाले असून, आतापर्यंत संपूर्ण जगभरात अशा केवळ २०० पेक्षा कमी केसेसची अधिकृत नोंद झाली आहे. यामुळेच प्रत्येक केस ही वैद्यकीय संशोधनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

या स्थितीच्या कारणांबाबत वैद्यकीय क्षेत्रात दोन मुख्य प्रवाह आहेत. सर्वात मान्य सिद्धांतानुसार, जेव्हा आईच्या गर्भात एकाच बिजांडापासून दोन जुळी मुले वाढू लागतात, तेव्हा पेशींच्या असमान विभाजनामुळे एक गर्भ दुसऱ्या गर्भाच्या शरीरात पूर्णपणे सामावला जातो. याला 'पॅरासिटिक ट्विन' किंवा परजीवी जुळे असेही म्हणतात. दुसरा सिद्धांत याला 'टेराटोमा' (एक प्रकारची गाठ) मानतो, परंतु पाठीचा कणा आणि अवयवांची निर्मिती ही केवळ गर्भावस्थेतील विसंगतीमुळेच शक्य असल्याने पहिला सिद्धांत अधिक ग्राह्य धरला जातो.

ही शस्त्रक्रिया यशस्वी पार पाडण्यासाठी डॉ. प्रखर नागर, डॉ. अनुप्रित सातपुते, डॉ. सविनय पाटील, डॉ. अनुज रंगम, डॉ अश्रित राळे, डॉ दिव्या सिंग, डॉ प्रियांका खर्डे यांच्यासह बालरोग, भूलतज्ञ, रेडीओलॉजी आणि पथोलॉजी विभागातील सर्व तज्ञांनी मेहनत घेतली. या सर्वांचे एसएमबीटी प्रशासनाकडून कौतुक आणि अभिनंदन करण्यात आले. अशा केसेसमध्ये अनेकदा जन्मानंतर लगेच लक्षणे दिसत नाहीत. बाळाचे पोट असामान्यपणे फुगलेले दिसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. दूध पिण्यास त्रास होणे किंवा वारंवार उलट्या होणे अशा लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. गर्भावस्थेदरम्यान नियमित 'अँटी-नेटल' सोनोग्राफी करणे अनिवार्य आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे गर्भात असतानाच अशा विसंगतींचे निदान होऊ शकते, ज्यामुळे जन्मानंतर तातडीने उपचार करणे सोपे जाते.

# ज्ञानभारतम प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी समन्वयाने कार्य करा - जिल्हाधिकारी



अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)-

भारताच्या समृद्ध सांस्कृतिक आणि बौद्धिक परंपरेचा अमूल्य ठेवा असलेल्या हस्तलिखितांचे जतन, संवर्धन आणि डिजिटायझेशन करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या 'ज्ञानभारतम' प्रकल्पाची जिल्हास्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात ज्ञानभारतम या प्रकल्पांतर्गत कार्यवाहीच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. यावेळी तहसीलदार नागेश गायकवाड, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, महानगरपालिकेचे उपायुक्त मेहेर लहारे, संग्रहालयाचे डॉ. संतोष यादव, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) राजश्री घोडके, यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, भारत सरकारमार्फत राबविण्यात येणारा ज्ञानभारतम प्रकल्प हा देशाच्या सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. जिल्ह्यातील प्राचीन हस्तलिखितांचा शोध घेऊन त्यांचे दस्तऐवजीकरण, संवर्धन आणि डिजिटायझेशन करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी सक्रिय सहभाग नोंदवावा. अनेक मौल्यवान हस्तलिखिते वैयक्तिक संग्राहकांकडे, मंदिरांमध्ये, मठांमध्ये आणि ग्रंथालयांमध्ये उपलब्ध आहेत. या हस्तलिखितांची योग्य नोंदणी करून त्यांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. ज्ञानभारतम मोबाईल पच्या माध्यमातून माहिती संकलनाची प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिल्या.

ज्ञानभारतम प्रकल्पामुळे भारताचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा राष्ट्रीय, तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक महत्त्वपूर्ण हस्तलिखिताचा या मोहिमेत समावेश व्हावा, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.


## जाहीर नोटीस

### मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/६२६/२६ दिनांक १३/०५/२०२६

**नोटीस**

श्रीम. माधुरी अंकुश थोरात, रा. मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे - अपिलार्थी

विरूद्ध

निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/मुख्याधिकारी
ग्रामपंचायत घोडेगाव - प्रतिवादी

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्जदार श्रीम माधुरी अंकुश थोरात रा मंचर ता आंबेगाव, जि. पुणे यांची अर्जदार नामे माधुरी नामदेव शेलार यांचा जन्म २.७.१९७९ रोजी मोजे घोडेगाव, ता. आंबेगाव जि.पुणे येथे झालेला आहे. यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३ (३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं. ६२६/२६ दिनांक रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे, सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. १३/५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

(अर्चना तांबे)
अति. उपविभागीय दंडाधिकारी
जुन्नर- आंबेगाव उपविभाग मंचर (पुणे)

**तहसिल कार्यालय, संगमनेर**
**क्रं.कावि/दंडाधि/वारस/२०२६**
**दिनांक – २२/०५/२०२६**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, कै. कैलास लक्ष्मण भरीतकर, रा. संगमनेर बु. ता. संगमनेर हे दिनांक २३/०३/२०२६ रोजी धामगाव ता. इगतपुरी या ठिकाणी मयत झालेले असुन ते दिवाणी न्यायालय अकोले ता. अकोले येथे बेलिफ या पदावर कार्यरत होते. त्यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

| अ.क्र. | वारसांची नावे | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १. | संगिता कैलास भरीतकर | ४८ वर्ष | पत्नी |
| २. | गौरव कैलास भरीतकर | २२ वर्ष | मुलगा |
| ३. | वैष्णवी कैलास भरीतकर | २५ वर्ष | मुलगी |

वरील प्रमाणे मयतास वारस असून या व्यतिरिक्त मयतास दुसरे कोणीही वारस नाहीत. या वारस पत्राबाबत कोणास काही हरकत तक्रार घ्यावयाची असल्यास ती आज पासुन कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवसांचे आत या कार्यालयास सादर करावी. तक्रार न आल्यास श्रीमती संगिता कैलास भरीतकर रा. संगमनेर बु. ता. संगमनेर जि. अहिल्यानगर यांना कुटुंब प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस यास श्रीमती संगिता कैलास भरीतकर रा. संगमनेर बु. ता. संगमनेर जि. अहिल्यानगर यांचे अर्जावरुन दिली असे.

(सही)
**तहसिलदार, संगमनेर**


# संगमनेरमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## कळसकर गुरुजींचे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुका ज्येष्ठ नागरिक महासंघ आणि राष्ट्रपती पारितोषिक प्राप्त आदर्श शिक्षक सोमनाथ कळसकर गुरुजी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने एच. एस. सी. परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी सन्मान सोहळा संगमनेर येथील नेहरू गार्डन येथे आज बुधवारी सायंकाळी पार पडला. अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष, उद्योजक रामनाथ कळसकर होते. यावेळी राष्ट्रपती पारितोषिक प्राप्त पुरस्कार विजेते सोमनाथ कळसकर, शांताराम मेमाणे, सुभाष पोखरकर, रमेश सराफ, डॉ. योगिता कळसकर, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे असिस्टंट गव्हर्नर अमोल वैद्य, अशोक गवांदे, बापूसाहेब वाकचौरे, विठ्ठलराव सोनवणे, राजू आंबेकर, पंकज घुले, सुरेश जाजू, प्राचार्य गांधी, रमेश सराफ, मधुकर बिबवे, गणपत बिबवे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना कळसकर गुरुजी म्हणाले की, शिक्षक व आई-वडिलांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार केले. मोबाईलपासून दूर राहा. जीवनात खूप मोठे व्हा, स्पर्धा परीक्षांना सामोरे जा. पंढरपूर, काशी येथे दर्शनाला न जाता कुटुंबातील ज्येष्ठ, श्रेष्ठ व्यक्तींचे दर्शन घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले. कळसकर विद्यालयात ३२ विद्यार्थिनींचे वसतिगृह कुठलेही अनुदान न घेता प्रतिष्ठान चालवत आहेत. १३५ विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व अभ्यासिका चालवली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी गुणवंत विद्यार्थी सार्थक बिबवे, आदित्य राऊत, कुमारी ईश्वरी हेमंत फटांगरे, पालक प्रतिनिधी आरती कुलकर्णी, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष गणेशलाल बाहेती, डॉ. जे. पी. शेख यांनी मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य ज्ञानेश्वर गोंटे यांनी केले. सूत्रसंचालन अशोक नवले व दिलीप नवले यांनी केले, तर आभार नंदकिशोर बेल्हेकर यांनी मानले.

ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्राव, जळजळ ?
पाईल्स (PILES) फिशर (FISSURE) फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
आजच संपर्क करा ! 7219100100

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



भंडारी
विवाह
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्

# लिंगनिदान रॅकेटवर मोठा घाव

## आणखी एक पोर्टेबल मशीन जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - लिंगनिदान चाचणी प्रकरणाचा तपास लोणी पोलीस स्टेशनकडून अत्यंत गांभीर्याने सुरू असून, या प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत १६ आरोपींना अटक केली आहे. तपासादरम्यान पुण्यातून अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींकडून महत्त्वाची माहिती समोर आली असून त्यांनी मारुती विश्वनाथ ढोरे (वय ४८, रा. केशवनगर, वडगाव मावळ) याला देखील लिंगनिदानासाठी वापरले जाणारे मशीन विकल्याची कबुली दिली होती.

या माहितीच्या आधारे लोणी पोलीस स्टेशन आणि अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय, श्रीरामपूर यांच्या संयुक्त पथकाने संबंधित आरोपीचा शोध घेत कारवाई केली. दिवसभर शोधमोहीम राबवल्यानंतर पोलिसांना आरोपी ताब्यात मिळाला. चौकशीदरम्यान त्याच्याकडून सोनोग्राफीसाठी वापरले जाणारे पोर्टेबल मशीन जप्त करण्यात आले.

प्राथमिक तपासात धक्कादायक बाब समोर आली असून, याच मशीनच्या माध्यमातून आरोपीकडून लिंगनिदान चाचण्या केल्या जात असल्याचे निष्पन्न झाले आहे. विशेष म्हणजे संबंधित व्यक्ती डॉक्टर नसतानाही तो अशा प्रकारच्या चाचण्या करत असल्याचे उघड झाले आहे.

दरम्यान, आरोपीची शारीरिक स्थिती अटक करण्यायोग्य नसल्याचे दिसून आल्याने त्याला तपासासाठी हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तपासादरम्यान पुण्यातील आरोपींनी आणखी काही डॉक्टरांना अशा प्रकारची मशीन विकल्याची कबुली दिल्याने पोलीस तपासाचा फास आणखी आवळला जात आहे. या प्रकरणात अनेक डॉक्टर, एजंट आणि संबंधित व्यक्तींची नावे समोर येत असून, लिंगनिदान रॅकेटचे मोठे जाळे उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिसांकडे संशयित व्यक्ती आणि अशा मशीनचा वापर करणाऱ्यांची माहिती उपलब्ध झाली असून त्या अनुषंगाने तपास वेगाने सुरू आहे. या प्रकरणाकडे केवळ कायदेशीर गुन्हा म्हणून न पाहता सामाजिक जबाबदारीच्या दृष्टीकोनातूनही पोलीस प्रशासन गंभीरपणे कारवाई करत असल्याचे दिसून येत आहे.

# बाळासाहेब थोरात यांच्या पाठपुराव्यातून रायतेवाडी फाटा उड्डाणपुलाचे काम पूर्णत्वाकडे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सततच्या विकास कामांमधून वैभवशील ठरलेल्या संगमनेर तालुक्याच्या विकासाला गती देणारा नाशिक - पुणे महामार्गाचे काँक्रिटीकरण पूर्णत्वात येत असून रायतेवाडी फाटावरील उड्डाणपुलाचे कामही अंतिम टप्प्यात आले आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी २०१३ मध्ये तत्कालीन केंद्रीय मंत्री सी.पी.जोशी यांच्याकडे पाठपुरावा करून विना टोल ९ किलोमीटर लांबीचा बायपास मंजूर करून घेतला. यानंतर सातत्याने विविध रस्त्यांच्या कामाबरोबर नाशिक - पुणे या राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण करून घेतले. आता नाशिक - पुणे रस्त्याचे पूर्ण काँक्रिटीकरण होत असून संगमनेर तालुक्यातील काम पूर्णत्वास आले आहे. यामुळे उत्तर महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा हा महामार्ग अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. पावसाळ्यामध्ये तर चंदनापुरी घाट व परिसर हा प्रवासी व पर्यटकांसाठी आनंद देणारा ठरत आहे.

याचबरोबर इंजिनिअरिंग कॉलेज ते संगमनेर बसस्थानक हा लक्ष्मी रोड चौपदरीकरण, पादचारी मार्ग सह डिव्हायडर अत्यंत गुणवत्तेचा झाला असून संगमनेरच्या वैभवात भर टाकणारा ठरला आहे. याचबरोबर संगमनेर खुर्द प्रवरानदी ते रायतेवाडी फाटा या रस्त्याचे विद्युतीकरण पूर्ण केले आहे. वाढत्या वाहतुकीमुळे नाशिक - पुणे महामार्गावरील इंजिनिअरिंग कॉलेज जवळील स्टेटस हॉटेल समोर व रायते फाटा येथे अपघातांचे प्रमाण वाढल्याने या दोन्ही ठिकाणी उड्डाणपुलासाठी लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे ७ फेब्रुवारी २०२२ रोजी पाठपुरावा केला. या पाठपुराव्यामधून इंजीनियरिंग कॉलेज जवळील उड्डाणपूल पूर्ण झाला असून वाहतुकीसाठी खुला झाला आहे.

तर रायतेवाडी फाटा येथे असलेल्या संगमनेरकडे येणाऱ्या रस्त्यासाठी उड्डाणपूल अत्यंत गरजेचा होता याकरता मा.मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे व संबंधित मंत्र्यांकडे पाठपुरावा केल्याने हे कामही आता अंतिम टप्प्यात आले आहे. यामुळे तालुक्याच्या दक्षिण भागातील व पठार भागातील नागरिकांना महामार्ग पार करण्यासाठी सोयीचे होणार आहे याचबरोबर या ठिकाणी होणाऱ्या दुर्घटना टळणार आहेत. हे काम अंतिम टप्प्यात आले असून येत्या काही दिवसात या पुलाचे काम पूर्णत्वास येणार आहे. यामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

- **रायतेवाडी सह दक्षिण भागातील व पठार भागातील विविध नागरिकांनी रायतेवाडी फाटा येथे उड्डाणपुलाची मागणी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्याकडे केली. २०२२ मध्ये या कामाला त्यांनी मंजुरी मिळून दिली याचबरोबर सातत्याने या उड्डाणपुलासाठी पाठपुरावा केला. उड्डाणपूलाचे काम आता अंतिम टप्प्यात आले असल्याने नागरिकांना हायवे पार करण्यासाठी अत्यंत सोयीचे होणार आहे. यामुळे या कामासाठी पाठपुरावा करणारे लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांचे आम्ही आभारी आहोत.**

# शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित प्रश्नांवर मंत्री दादाजी भुसे यांच्यासोबत आ. सत्यजीत तांबे यांची चर्चा



युवावार्ता (प्रतिनिधी)

मुंबईत मंगळवारी दि. १९ फेब्रुवारी रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीनंतर राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची भेट घेऊन विधानपरिषद आ. सत्यजीत तांबे यांनी शिक्षण क्षेत्रातील विविध प्रलंबित प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा केली. तसेच दि. २१ मे रोजी शिक्षण आयुक्तांसोबत आयोजित बैठकीसंदर्भातही त्यांनी मंत्र्यांशी संवाद साधत शिक्षण क्षेत्रातील विविध प्रलंबित मागण्या व अडचणींबाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी, मागण्या मान्य न झाल्यास दि. २५ मे रोजी आंदोलन करण्यात येणार असल्याची भूमिका स्पष्टपणे मांडण्यात आली. त्यावर मंत्री दादाजी भुसे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आंदोलनाची वेळ येऊ देणार नाही, असे आश्वासन दिले.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता- श्री स्वामी समर्थ एजन्सी, स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क - 7030334486 7030334494

# संगमनेरमध्ये दिव्यांग भवनाच्या कामाला विलंब

## दिव्यांग सारथी संघटनेचा प्रशासनाला उपोषणाचा इशारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील दिव्यांग सारथी संघटनेच्या वतीने दिव्यांग भवनाच्या बांधकामास तातडीने सुरुवात करावी, अशी मागणी नगरपरिषद प्रशासनाकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्याधिकारी आणि नगराध्यक्ष यांना लेखी निवेदन देण्यात आले.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, दिव्यांग भवनाचा प्रस्ताव मंजूर होऊन तब्बल दोन वर्षांचा कालावधी उलटला असतानाही प्रत्यक्षात कामाला सुरुवात झालेली नाही. माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी दिव्यांग बांधवांच्या सोयीचा विचार करून नेहरू गार्डन परिसरात जागा निश्चित करून दिली होती. तहसील कार्यालयाच्या जवळ सुविधा उपलब्ध व्हाव्यात, हा त्यामागील उद्देश होता.

निवेदनात असेही नमूद करण्यात आले आहे की, दिव्यांगांसाठी उपलब्ध असलेल्या पाच टक्के निधीपैकी अडीच टक्के निधी दिव्यांग भवनासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. मात्र, अनेक वेळा पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून केवळ आश्वासनांची पूर्तता होत असल्याने दिव्यांग बांधवांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

नवीन नगराध्यक्ष सौ. मैथिलीताई तांबे, उपनगराध्यक्ष नूरमहंमद शेख, नगरसेवक आणि संबंधित प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन दिव्यांग भवनाचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. दिव्यांगांसाठी अत्यावश्यक असलेल्या या प्रकल्पाच्या विलंबामुळे संबंधित बांधवांमध्ये अस्वस्थता वाढत असून, प्रशासन आता कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी | योनी मार्गाची दुर्गंधी
अंगावरून पांढरे जाणे | गुप्त अंगाला खाज
गर्भ न रहाणे | विविध त्वचा विकार
वारंवार गर्भपात होणे | गुप्तरोग, गर्मी
गर्भाशयात गाठी | लघवीला जळजळ
गर्भाशयाचा कर्करोग | संभोगात रस न येणे
स्तनांची वाढ न होणे | संभोगा विषयीची भीती
स्तनातून दूध न येणे | हस्तमैथूनाची सवय
स्तनात गाठी | लैंगिक विकृती
स्तनाचा कर्करोग | मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25